१५२
२

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ८५...

BOMBAY THEISTIC ASSOCI...
LITERATURE SERIES

भागवतधर्म

# ...कनाथी भागवतांतील वेंचे.

हे

न्यायमूर्ती म. गो. रानडे.

यांनीं वेंचून तयार केले.

---

...े मंडळीस...

नं ३०८ → म. ग्रं. सं. ठाणें
304
विषय काव्य
लेखक न्या. म. गो. रानडे
सन १८८४
संग्रहालय क्रमांक ८८८
पुस्तकाचें नांव एकनाथी भागवतांतील वेंचे.

सं. का० य्य १५२

# भागवतधर्म.

## एकनाथी भागवतातील वेंचे.

योग मार्गापेक्षां भक्ति थोर कशी.

॥ इंद्रियें कोंडितां न कोंडती ॥ विषय सांडता न सांडती ॥ पुढतपुढती बाधों येती ॥ यालागीं हरिभक्ति द्योतिली वेदें ॥ इंद्रियें कोंडावी न लागती ॥ सहज राहे विषयासक्ती ॥ एवढें सामर्थ्य हरिभक्तीं ॥ जाण निश्चितीं नृपवर्या ॥ योगी इंद्रियें कोंडिती ॥ ते भक्त लाविती भगवद्भक्तीं ॥ योगि विषय जे त्यागिती ॥ ते भक्त अर्पिती भगवंतीं ॥ योगी विषय त्यागिती ॥ त्यागितां देह दुःखी होती ॥ भक्त भगवंतीं अर्पिती ॥ तेणें होती नित्यमुक्त ॥ दारा सुत गृह प्राण ॥ करावे भगवंतासी अर्पण ॥ हे भागवतधर्म पूर्ण ॥ मुख्यत्वें भजन या नाव ॥

### ज्ञानापेक्षां भक्ति थोर कशी.

॥ न करितां वेदशास्त्रव्युत्पत्ती ॥ ऐशिया अज्ञाना निजात्मप्राप्ती ॥ सुगम जोडे ब्रह्मस्थिती ॥ यालागीं हरिभक्ति प्रकाशिली देवें ॥ तें हे राया भागवत जाण ॥ मुख्यत्वें भक्ति प्रमाण ॥ भावें करितां भगवद्भजन ॥ अज्ञानजन उद्धरती ॥ स्त्री शूद्रादि अवघे ॥ घालूनियां ये नावे ॥ एकेच खेपें स्वयें न्यावें ॥ भजनभावें परतीरा ॥ येथें पोहणें यावीण उतरणें ॥ प्रयासेवीण प्राप्ति घेणें ॥ सुखोपायें ब्रह्म पावणें ॥ यालागीं नारायणें प्रकाशिली भक्ती ॥ भागवतधर्माची स्थिती भाळीं भोळीं भवाब्धि तरती ॥ सुखोपायें ब्रह्मप्राप्ती ॥ तेचि श्लोकार्थी विशद सांगे ॥

### कर्म मार्गापेक्षां भक्ति थोरकशी.

॥ ज्यास भगवद्भजनीं विश्वासू ॥ विधि निषेध त्याचा दासू ॥ देवोनि निज भजन विलासू ॥ स्वयें जगन्निवासू सुखावे ॥ भजन प्रताप संत

लक्षणें ॥ स्वधर्म कर्मा ऐसें दंडणें ॥ वर्णाश्रमाचा ठाव पुसणें ॥ होळी करणें कर्मांची ॥ एवं भागवतधर्मीं जे सेवक ॥ स्वधर्म कर्म त्यांचे रंक ॥ ते राहों न शके त्यां सन्मुख ॥ मा केंवि बाधक हों शकेल ॥

### भक्ति मार्गाचा अधिकार सर्वांस आहे.

॥ जो श्रुति स्मृति नेणता ॥ भावें भजे भगवत्पथा ॥ त्यासि विधि निषेध बाधकता ॥ स्वप्नींही सर्वथा प्रमाद न घडे ॥ श्रुति स्मृति दोनी डोळे ॥ तेणेंवीण जे आंधळे ॥ तेही हरि भजनीं धांवतां भावबळे ॥ पडेना आडखुळे सप्रेम योगें ॥ ऐसें आचरितां भागवत धर्म ॥ बाधूं न शके कदा कर्म ॥ कर्मासि ज्याची आज्ञानेम ॥ तो पुरुषोत्तम भजना माजी ॥

### भक्त देवाला सर्व समर्पण कसें करितो.

॥ हैतुक अथवा अहैतुक ॥ वैदिक लौकिक स्वाभाविक ॥ भगवंतीं अर्पे सकाळिक ॥ या नांव

देख भागवतधर्म ॥ बाधूं न शके स्वधर्म कर्म ॥ ऐक राया त्याचें वर्म ॥ मनीं प्रगटला पुरुषोत्तम ॥ अति निःसीम निज बोधें ॥ जंव दृष्टि देखे दृश्यातें ॥ तंव देवोचि देखे तेथें ॥ यापरी दर्शनातें ॥ अर्पी भजन सत्ते दृष्टीचा विषयो ॥ श्रवणेंचि यापरी श्रवण ॥ करितां उठिलें ब्रह्मार्पण ॥ हेतु रहित भगवद्भजन ॥ स्वभावें जाण स्वयें होतें ॥ जो सुमना सुमनपण जोडी ॥ तो घ्राणाचें घ्राण होय आवडी ॥ मग नानासुवास परवडी ॥ ब्रह्मार्पण मोडी निजभोग अर्पी ॥ रसना रस घेऊं जाये ॥ तंव रसस्वाद देवचि होये ॥ मग रसनेमाजी येऊन राहे ॥ ब्रह्मार्पण पाहे रसभोगवृत्ती ॥ स्पर्श घेइजे निज देहीं ॥ तंव देहींच प्रगटे विदेही ॥ मग स्पर्शी जें जें कांहीं ॥ तो तो भोगूं पाहीं ब्रह्मार्पणें उठी ॥ जेउतें जेउतें चालवी पाये ॥ तों तों मार्गू देवोचि होये ॥ मग पावलांपाउलीं पाहे ॥ निजभजन होये ब्रह्मार्पणेशीं

११.काव्य १४ 
काव्य ३०

खरी समाधी भक्ताची.

॥ कर्माचरणीं समाधी ॥ एक ह्मणती न घडे कधीं ॥ ते पावले नाहीं निजात्मबोधीं ॥ जाण त्रिशुद्धी विदेहा ॥ ताटस्था नाहीं समाधी॥ ह्मणे त्याची ठकली बुद्धी ॥ ते समाधी नव्हे त्रिशुद्धी ॥ जाणा तुसधी मूर्च्छा आली ॥ ताट स्थ्यापासूनि उठिला ॥ तैं तो समाधीस मुकला ॥ तेव्हां एकदेशी भावो आला ॥ मंद या बोला न मानिती सत्य ॥ बुद्धी आकळलें परब्रह्म ॥ तैं अहेतुक चाले कर्म ॥ हेंचि बुद्धीचें अर्पण परम ॥ इतर तो श्रम अनुज्ञान नाज्ञ॥ ते स्वरूपीं निरवधी ॥ भजनशील जाहली बुद्धी ॥ ते सकळ कर्मी समाधी ॥ निजार्पणविधि स्वयें जाहली ॥

वर्णाश्रम धर्माविषयीं निरभिमान कसा असावा.

॥ तरी देह गेह वर्णाश्रमे ॥ स्वभागा आलीं जीं जीं कर्में ॥ तीं तीं आचरोनि निजधर्में ॥ पूर्वानुक्रमें अनहंकृती ॥ कर्मकलाप आघवा ॥

आचरोनि आणी गौरवा ॥ परी कर्तेपणाचिया भावा ॥ अहंभावा स्पर्शेना ॥ मजपासून जाहलें सत्कर्म ॥ माझा आचार अति उत्तम ॥ त्यां निरसिलें मरणजन्म ॥ हा स्वभावें देहधर्म उठोची नेणें ॥ देहसंगें तरी वर्तणें ॥ परी देहधर्म धरूं नेणें ॥ देहस्वभाव लक्षणें ॥ ब्रह्मार्पणें विचरती॥ जें जें कर्म स्वाभाविक ॥ तें तें ब्रह्मार्पण अहैतुक ॥ या नाव भजन निर्दोख ॥ भागवतधर्म देख या नाव ॥ स्वाभाविक जें वर्तन ॥ तें सहजें होय ब्रह्मार्पण ॥ या नाव शुद्ध आराधन ॥ भागवत धर्म पूर्ण जाण राया ॥ जरी जाहले वेदशास्त्रसंपन्न ॥ तिहीं न करितां भगवद्भजन मायानिवर्तक ब्रह्मज्ञान तयासिही जाण कदा नुपजे ॥

**भक्तिच्या योगें विरक्ति शांति व मुक्ति कशी प्राप्त होते.**

॥ सायुज्यादि चार मुक्ती ॥ अंकीं वाढवावी भगवद्भक्ती ॥ ते न करितां अनन्य गती ॥ शास्त्रज्ञां मुक्ती न घडे कदा ॥ तारावया भाळे

झाले जन ॥ मुख्य चित्तशुद्धीच कारण ॥ जन्मकर्म हरीचे गुण ॥ करावें श्रवण अत्यादरें॥ जें जें केलें पुराण श्रवण ॥ तें तें व्यर्थ होय मननेविण ॥ यालागीं श्रवणाचें मनन ॥ सावधान करावें ॥ ऐसें मननयुक्त श्रवण ॥ करितां ओसंडे हर्ष पूर्ण ॥ तेणें हर्षें हरिकीर्तन ॥ करी आपण स्वानंदें ॥

### जपतपादि साधनापेक्षां कीर्तन श्रेष्ठ आहे.

॥ कीर्तनें निर्दळिले दोष ॥ जप तप ठेले निरास ॥ यमलोक पाडिला वोस ॥ तीर्थाची आस निरास जाहली ॥ यम नियमा पडती उपवास ॥ मरो टेकले योगाभ्यास ॥ कीर्तन गजरें हृषीकेष ॥ निर्दाळी दोष नाममात्रें ॥ ज्यांसि न करवे कथा श्रवण ॥ अथवा न करवे हरी कीर्तन ॥ तिहीं करावें नामस्मरण ॥ रामकृष्ण गोविंद ॥ ऐसा वाणल्या भक्तियोग ॥ न धरी जाणपणाची फुग ॥ त्यजूनि अहंममता पांग ॥ विचरती निःसंग हरिकीर्तनीं ॥

### भगवत प्राप्तीची खुण.

॥ तेवीं जीवशिवां अवचटी ॥ भक्तांचे पेठे जाहली भेटी ॥ आत्मसाक्षात्कारें पडे मिठी ॥ ते संधीमाजी उठी अनिवार रुदन ॥ परमात्मयासि आलिंगन ॥ तेणें अनिवार स्फुंदन ॥ रोमांचित रुदन ॥ सप्रेम पूर्ण उसोसोनि करी ॥

### भगवंताचें खरें स्वरूप कसें पाहावें.

॥ पृथ्वी आप तेज वायु नभ ॥ देखे हरिरूप स्वयंभ ॥ भूतें महा भूतांचें डिंब ॥ नदेखे भिन्न कोंभ अभिनवें ॥ ह्मणे दुर्वाद्रुमवनवल्ली ॥ हेवि अनंत कोटी रोमावळी ॥ हरीचेनि अंगें असे वाढली ॥ त्या निज शोभा शोभली हरिरुपतळें ॥ हे असो जेवी जावळें फळें ॥ न होणें येर येरां वेगळें ॥ तेवीं भक्ति विरक्ती एके काळें ॥ भक्त तेणें बळें बळिष्ट होती ॥ जैशी कीजे भगवद्भक्ती ॥ तैसीच होय विषयविरक्ती ॥ तदनुसारें अनुभव स्थिती ॥ ती भक्त पावती तेचि क्षणीं ॥ भक्ती ह्मणजे सर्व भूतीं ॥ सप्रेम

सं.का०४१४

भशन युक्ती ॥ प्राप्ती ह्मणजे अपरोक्ष स्थिती ॥ भगवत्स्फुर्ती अनिवार ॥

विरक्तीचें लक्षण.

॥ विरक्ती ह्मणिजे ऐशी पहाहो ॥ स्त्रीपुत्र देहादि अहंभावो ॥ समूळ जेथें होय वावो ॥ विरक्ति निर्वाहो या नाव राया ॥ करितां ऐक्यभावें निजभक्ती ॥ उत्कृष्ट उपजे पूर्ण शांति ॥ तेणें होय असतांची निवृत्ती ॥ भक्ता पूर्ण प्राप्ती परमानंदें ॥ यालागीं धन्यभगवद्भक्त ॥ इंद्रियीं वर्तता विषयीं विरक्त ॥ देही असोनि देहातीत ॥ नित्यमुक्त हरिभजनें ॥ हा गभवंताचा निजमहिमा ॥ अनुपम नाहीं उपमा ॥ भावें भजोनि पुरुषोत्तमा ॥ परमात्म गरिमा पावले ॥ पूर्ण प्राप्तीचा मुख्य ठावो ॥ सर्वभूतीं भगवद्भावो ॥ हाचि पूर्ण भक्तीचा निजगौरवो ॥ तोचि अभिप्रावो हरि सांगे ॥

भगवंताची सर्वत्र व्याप्ति.

॥ सर्व भूतीं मी भगवंत ॥ सर्व भूतें मज

आंत ॥ भूतीं भूतात्मा मीचि समस्त ॥ मीच येथ परमात्मा ॥ सर्वांभूतीं भगवंत ॥ भूतें भगवंती वर्तत भूतीं भूतात्मा तोचि समस्त ॥ मी ह्मणणें तेथें मीपणा नये ॥ तो भक्तांमाजी अति श्रेष्ट ॥ तो भगवतांमाजी वरिष्ठ ॥ त्यासि उत्तमत्वाचा पट ॥ अवतार श्रेष्ट मानिति ॥

प्रतिमापूजा भक्तिचा अतिगौण मार्ग आहे.

॥ पाषाण प्रतिमा हाचि देवो ॥ तेथेंचि ज्यांचा पूर्ण भावो ॥ भक्त सज्जानांसि पहाहो ॥ अणुमात्र देहो लवों नेदी ॥ ते ठायीं साधारण जन ॥ त्याची वार्ता पुसे कोण ॥ त्यासी स्वप्नींही नाहीं सन्मान ॥ यापरी भजन प्राकृतातें ॥ ऐशिया स्थितीं जो जडभक्तु ॥ तो जाणावा मुख्य प्राकृतु ॥ प्रतिमा भंगे अंतु ॥ मानी निश्चितु देवाचा ॥ इंद्रियें विषयातें सेविती ॥ परी सुख दुःख नुमटे चित्तीं ॥ विषय मिथ्यात्वें देदेखती ॥ ते जाण निश्चितीं उत्तम भक्त ॥ परी मी एक विषय भोक्ता ॥ ही स्वप्नींही त्यास

नुमटें कथा ॥ यालागीं उत्तम भागवतता ॥ त्यासीच तत्वतां बाणली ॥

सराबंध मोक्ष कोणता.

॥ देहेंद्रिय मनोबुद्धी प्राण ॥ हेंचि बंधाचें पंचायतन ॥ क्षुधा तृषा भयक्लेश पूर्ण ॥ जन्म-मरण इत्यादि ॥ या पांचांस्थानीं अपार श्रम ॥ या नाव ह्मणिजे संसारधर्म ॥ निजभक्तां प्रसन्न आत्माराम ॥ त्यासि भवभ्रम स्वप्नींही नाहीं ॥ देहासि आलिया नानाविपत्ती ॥ भक्तां खेदू नुमटे चित्तीं ॥ जेवीं आकाश शस्त्रघातीं ॥ नये काकुळती तैसे ते॥ हृदयीं चिंतितां आत्मा-राम ॥ तद्रूप जाहला हृदयींचा काम ॥ त्यासि सर्वकर्मी पुरुषोत्तम ॥ देवदेवोत्तम तुष्टोनि प्रगटे॥ ऐसा जो निष्कामनिष्ट ॥ तोचि भगवंतामाजी श्रेष्ट ॥ त्यासीच प्रधानत्वपट ॥ जाण तो वरिष्ट उत्तमत्वें ॥ तो कर्म करी परी न ह्मणे मी कर्ता ॥ जेवी गगनीं असोनि सविता ॥ अग्नि उपजवी सूर्यकांता ॥ तेवीं करोनि अकर्ता निजात्मदृष्टी ॥

देहींचीं कर्मं अदृष्टें होतीं ॥ मी कर्ता ह्मणतां तीं बाधती ॥ भक्त सर्व कर्मं अनहंकृती ॥ परमात्मप्रतीती भजनयोगें ॥

### वर्णाश्रमा विषयीं उदासीनता.

जरी जाहला उत्तम वर्ण ॥ तरी तो न ह्मणे मी ब्राह्मण ॥ स्फटिक कुंकुमें दिसे रक्तवर्ण ॥ मी लोहिवा पूर्ण स्फटिक न ह्मणे ॥ ज्यासि नाहीं देहाभिमान ॥ तो हातीं न धरीच देह वर्ण ॥ तैसाच आश्रमाचा अभिमान ॥ भक्त ज्ञान न धरी कदा॥ अंगीं बाणला तो सन्यासु परी तो न ह्मणे मी परमहंसु ॥ जेवीं नट अंगीं राजविलासु ॥ तो राजउल्हासु नट न मानी ॥ तेवीं आश्रमादि अवस्था ॥ भक्त न धरीच सर्वथा ॥ तैशीच जातीची ही कथा ॥ न घे माथां भक्तोत्तम ॥ जाति उंच नीच असंख्य ॥ परी तो न ह्मणे हे माझीची एक ॥ जेवीं गंगातीरीं गांव अनेक ॥ परी गंगा माझा एक गांव न ह्मणे ॥ तेवीं जन्मकर्म वर्णाश्रम

त हातीं त धरती ।। बहुं दे
स्वभोही न धरिती हरिभक्त ।।
जन्मप्राती ।। जेव्हां त्या सेवं
ाती ।। जन्म अभिमानें माथां
ात जातीपै माझी ।।

यभक्ति कशी करावी.

यीं प्रीती ज्या जैशी ।। हरीची
ा ।। जे अनन्य हरिपाशीं ।।
ा अनन्य सदा ।। ऐसे जे हरिचरणीं
य ।। तोचि भक्तांमाजी प्रधान ।। वैष्णवांत
आग्रगण ।। राया ते जाण भागवतोत्तम ।।

कर्मे कर्ता ह्मणतां
ती ... कृती ॥ परमा-

ता.
ो न ह्मणे मी
से रक्तवर्ण ॥
ह्मणे ॥ ज्यासि
धरीच दे
॥ भक्त
ह
री
ासु

